| उपक्रमाचे नाव | करिअर मार्गदर्शन व समुपदेशन शिबिर |
|---|---|
| उपक्रमाची सुरवात | सन २०२२-२३ |
| प्रस्तावना | आजच्या जागतिकीकरण, विज्ञान तंत्रज्ञान, माहिती तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांना व पालकांना योग्य शैक्षणिक व व्यवसायिक मार्गदर्शन मिळणे अगत्याचे झाले आहे. वाढत्या औद्योगिक कारणामुळे आणि विज्ञानाच्या प्रगतीमुळे व्यवसायाची अनेक नवीन क्षेत्रे आजच्या काळात उपलब्ध झालेली आहेत या क्षेत्रामध्ये सुयोग्य मनुष्यबळाची नेहमीच आवश्यकता भासत असते. या सर्वांची जाणीव विद्यार्थ्यांना व पालकांना करून देणे महत्वाचे आहे. स्वत:च्या आवडीनुसार आणि क्षमतेनुसार विद्यार्थ्यांना योग्य असा शिक्षणक्रम घेता आला तर त्यांच्या उपजत गुणांना खूप वाव मिळतो. सध्या १० वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना उपलब्ध असणारे विविध शिक्षणक्रम व व्यवसाय यांची माहिती मिळणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे व कुटूंबाचा चांगला सदस्य व भारतीय समाजरचनेच्या एक जबाबदार तसेच विकासात्मक कार्यात महत्वाची भूमिका बजावण्यास सिद्ध व सुसंस्कृत नागरिक बनावा यासाठी आजच्या शिक्षक, मुख्याध्यापक आणि पालक यांनी अधिक जागरूक व डोळस असणे जरूरीचे आहे. विद्यार्थ्यांना राज्यातील व राज्याबाहेरील उपलब्ध असणारे अभ्यासक्रम व करिअरची क्षेत्रे याची माहिती करून देण्यासाठी सारथीची विभागीय मुख्यालय असलेल्या सर्व ठिकाणी एकदिवशीय व्यवसाय मार्गदर्शन व मानसशास्त्रीय समुपदेशन शिबिर कार्यक्षेत्रातील प्रत्येक जिल्ह्यात आयोजित केले जाते. |
| उपक्रमाची उद्दिष्ट्ये | १. लक्षित गटातील विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन व समुपदेशन शिबिर आयोजित करून विविध क्षेत्रातील विषयातील करिअर च्या संधी यांची ओळख करून देणे.<br>२. लक्षित गटातील विद्यार्थी, पालक यांचे वैयक्तिक समुपदेशन करणे व शिबिरातील उपस्थित विद्यार्थ्यांना आवश्यकतेनुसार विद्यार्थ्यांची कल चाचणी घेऊन मार्गदर्शन करणे.<br>३. लक्षित गटातील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास करण्यास मदत करणे. |

| | |
|---|---|
| **उपक्रमाचे स्वरूप** | सारथी संस्थेमार्फत लक्षित गटातील विद्यार्थ्यांना राज्यातील व राज्याबाहेरील उपलब्ध असणारे अभ्यासक्रम व करिअरची क्षेत्रे यांची माहिती करून देण्यासाठी सारथीच्या विभागीय केंद्र असलेल्या सर्व आठ विभागीय मुख्यालयी एक दिवसीय व्यवसाय मार्गदर्शन व मानसशास्त्रीय समुपदेशन शिबिर मुंबई, पुणे, कोल्हापूर, नाशिक, नागपूर, औरंगाबाद , अमरावती ,लातूर या आठ विभागीय केंद्रावर आयोजित केले आहे.<br><br>प्रस्तुत शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे **(SCERT)** यांचेकडील जिल्हास्तरावरील तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून पुढील विषयावरील मार्गदर्शन केले जाते.<br><br>**१.** स्वतःला ओळख व करिअर निवड<br>**२.** विज्ञान शाखेतील करिअर (टेक्निकल, मेडीकल)<br>**३.** कला शाखेतील करिअर<br>**४.** ललित कला क्षेत्रातील करिअर<br>**५.** वाणिज्य क्षेत्रातील करिअर<br>**६.** ताणतणाव व्यवस्थापन व अभ्यास कौशल्य<br>**७.** परीक्षेला सामोरे जाताना<br>**८.** विद्यार्थी, पालक शंका समाधान |
| **पात्रता अट** | महाराष्ट्रातील शासकीय व खाजगी अनुदानित माध्यमिक शाळेतील इयत्ता 10 वी मध्ये नियमित शिकत असलेले विद्यार्थी |
| **आयोजन कालावधी** | दरवर्षी जानेवारी ते फेब्रुवारी |
| **सन २०२२-२३ ते २०२४-२५ सहभागी विद्यार्थी संख्या** | १९,२०० |